लोकमत

# एमआयटीत सायबर गुन्हे व जागरूकता कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदीतील एमआयटी महाविद्यालयात 'सायबर गुन्हे व जागरूकता' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. याप्रसंगी डॉ. विकास महांडुळे, रोहिणी तारडे, शिल्पा कोल्हे, प्रीती भारंबे, निशिगंधा भालेकर, प्राचार्य डॉ. बी. बी. वाफारे, उपप्राचार्या डॉ. मानसी अतितकर आदी मान्यवर उपस्थित होते.

एमआयटी महाविद्यालय, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभाग, पुणे सायबर सेल व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा घेण्यात आली. पहिल्या सत्रात क्विक हिल फाउंडेशनचे कार्यकारी प्रमुख सुगंधा दाणी यांनी सोशल नेटवर्किंग साइट्स वापरताना विद्यार्थी व पालकांनी कोणत्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे हे सांगितले.

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक व्यवस्थेत समाज माध्यमांचा वापर सकारात्मक पद्धतीने करावा. या संदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात पुणे शहर सायबर सेलचे हवालदार नीतेश बिच्चेवार, पोलीस उपनिरीक्षक प्रमिला क्षीरसागर व सीमा मुंडे यांनी सायबर कायदा, सायबर दक्षता, सायबर गुन्हे, समाजामध्ये घडणाऱ्या विविध सायबर गुन्ह्यांची माहिती दिली.

विद्यार्थांना सायबर गुन्हा कशा पद्धतीने घडू शकतो, समाज माध्यमांना आपण कशा पद्धतीने हाताळत आहोत आणि कोणती जागरूकता घ्यायला हवी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्या व विभागप्रमुख अक्षदा कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक अमित ताले यांनी केले.